**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ गौरव गुलाबराव बावनकर यांचा उलटतपास शपथेवर श्री.व्ही.के.कौटकर वकीलांमार्फत सुरु.**

**२७.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दाव्यामधील परिच्छेद क्र. २ मधील अठरावी लाईन - पोर्शन मार्क 'अ' व माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील पोर्शन मार्क 'अ' हा बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ६१५ ही प्रतिवादी क्र. १ ची वडीलोपार्जित जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ने जे बांधकाम केले आहे ते सिटी सर्वे क्र. ६१५ व त्याला लागून जागेत केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ९२ वरील नकाशामध्ये तिरप्या लाईन या बांधकामाकरीता दर्शविल्या आहे व त्याला लागून खाली जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ९२ वरील नकाशामध्ये खाली जागांना नंबर दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीचा कोणताही पुरावा किंवा नकाशा दाव्यात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अतिक्रमण दाखविण्याकरीता भूमी अभिलेख कार्यालयाकडून अतिक्रमणाची मोजणी आज पर्यंत करून घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अतिक्रमण केल्याबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. अतिक्रमण केल्याबाबतचा सरकारी पुरावा मी दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अतिक्रमण केल्याबाबतचा सरकारी पुरावा मी दाखल केला आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा करत असलेल्या जमीनीचा नमुना किंवा इतर ग्रामपंचायतीचे कागदपत्रे मी दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, रेकॉर्ड गहाळ झाल्याबाबत मी ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र घेतले नाही. ग्रामपंचायतीकडून वाद मिळकतीची मी किंवा माझ्या वडीलांनी मोजणी केल्याचे मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी रेकॉर्डवर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी क्र. १ यांच्या मालकी कब्जात असलेल्या जागेची आखीव पत्रिका दाखल केली आहे व त्यामध्ये प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भाउ गुलमोहम्मद आणि शेर अहमद यांचे नावे आहे. मी गुलमोहम्मद व शेर अहमद यांना दाव्यात पक्षकार केले नाही कारण ते मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यांच्या वारसांना दाव्यात पक्षकार केले नाही किंवा प्रतिवादीचे दोन्ही भाउ मयत असल्याबाबत मृत्यू दाखला दाखल केला नाही. साक्षीदाराला प्रतिवादी क्र. १ व त्यांचे दोन भाउ त्यांचे नावे असलेली इमारतींच्या जागांसाठी सनदचा नमुना ह्या कागदाची प्रत दाखविण्यात आली. (वादीतर्फे वकीलांनी सदर सनदच्या प्रतला निशाणी देण्यास हरकत घेतली आहे. त्यांच्या मते सदरचा कागद हा मालकी हक्क दाखवत नाही.

साक्षीदाराला उलटतपासामध्ये सदर सनद दाखविण्यात आल्याने तसेच ते सदरचा कागद हा पब्लीक डॉक्यूमेंट असल्याने त्यास **निशाणी क्र. १००** देण्यात येते.) हे म्हणणे खरे आहे की, सदरची सनद ही १९७२ सालची आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर जागेची चौकशी होवून सनद देण्यात आली आहे तसेच मी राहत असलेल्या बाजार चौकाच्या घराची देखील मला सनद मिळाली आहे. प्रतिवादी क्र.१ च्या सनद बाबत आक्षेप मी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, उप संचालक भूमी अभिलेख किंवा इतर कुठे घेतल्याबाबत मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन १९७२ ते २०१५ यामध्ये सनद बद्दलचा आक्षेप किंवा सनद दुरूस्त करा याबाबत कारवाही केली नाही. माझी कथीत जागा माझ्या नावावर होण्याकरीता मी सन १९७२ ते आजपर्यंत प्रयत्न केल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाव्यात दाखल केला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरची जागा माझ्या आजोबांच्या नावावर आहे त्यामुळे मी प्रयत्न केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची दावा मिळकत माझ्या नावावर किंवा माझ्या आजोबांच्या नावावर असल्याबाबत सनद किंवा आखीव पत्रिका दाव्यात दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत माझ्या आजोबांच्या नावावर असल्याबाबत कागदपत्रे मी लावली आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, फकीराजी बावनकर व त्यांची मुल परमानंद, गुलाबराव व मय्यत पुरूषोत्तम बावनकर यांचे वारसदार यांच्यामध्ये १९८३ साली नोंदणीकृत वाटणीपत्र झाली. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटणीपत्रानुसार घरे व शेती यांची वाटणी झाली. हे म्हणणे खरे आहे की, वाटपपत्रानुसार वॉर्ड क्र. ४ 'ब' व 'क' वरील जागा परमानंद यांच्या हिस्यात गेली आहे व परमानंद यांनी सदरची जागा प्रतिवादी क्र. २ यांना विक्रीपत्र करून विकलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाटणीपत्रामध्ये परमानंद यांच्या हिस्याला आलेले वॉर्ड क्र. ४ मधील ब आणि क मधील जागा यांच्या चतू:सिमा व आराजे बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटणीपत्रामध्ये फकीराजी बावनकर पक्षकार आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीचा वाटणीपत्रामध्ये उल्लेख नाही व ती फकीराजी बावनकर यांच्या हिस्याला दिली असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीची अशा कोणतीही जागा नाही व मी सदरची जागा असल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही जागा नसल्याने त्याचा वाटणीपत्रात उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीच्या जागेबाबत करारनामा झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र.

६३१ पश्चिम - उत्तर जागेला वाद मिळकत आहे व त्याचा उपयोग गुरे ठेवण्याकरीता होत होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फकीराजी यांनी करारनामा वजा मृत्यू पत्र केले व वाद मिळकत वादीच्या नावावर केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत करारनामा वजा मृत्यूपत्राचे प्रोबेट केले नाही. फकीराजी मरण पावल्यानंतर ग्रामपंचायतीच्या रेकॉर्ड मध्ये कथीत करारनामा वजा मृत्यूपत्रांन्वेय वाद मिळकतीमध्ये नाव चढविण्याकरीता अर्ज केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारनामा वजा मृत्यूपत्र हे मी खोटे व बनावट केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, करारनामा वजा मृत्यूपत्रांन्वेय वादीला हक्क दिले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फकीराजी यांनी वाद मिळकत जागा ०७.०८.१९४४ नुसार विक्रीपत्रांन्वेय विकत घेतली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरची जागा सन २०१४ पर्यंत वादी वापरत होतो हे मी खोटे सांगत आहे.

**प्रतिवादीतर्फे वकीलांच्या तोंडी विनंती वरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.02.25 17:08:12 +0530

दिनांक – २५/०२/२०२५.
सावनेर.

(एस. एम. गाडे)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ट स्तर,
सावनेर, जि. नागपूर.